मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर
आ. क्र. नर/मा.अ/२२/२०२१-२२
दाखल ता. ०८/०१/२०२१
सहाय्यक संचालक नगररचना
मि.भा.म.न.पा.

(नियम 3 पहा)

# केंद्रीय माहितीचा अधिकार, अधिनियम 2005 अन्वय

माहिती मिळण्यासाठीचा अर्ज नमुनापत्र — 3 प्रमाणे

**प्रति,**
**मा. शासकीय माहिती अधिकारी,**
**नगररचना विभाग,**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका, भाईंदर (प.)**

10रु. COURT FEE Rs.10 INDIA 5 DEC 2020 दस रुपये TEN RUPEES

1) अर्जदाराचे संपुर्ण नांव : श्री. अशोक बळवंत पाटील. (मोबाईल नं. 9820469555)

2) पत्ता : मुर्धागांव, उत्तन रोड, भाईंदर (प.) मिरा भाईंदर — महानगरपालिका क्षेत्र, ता.जि. ठाणे, 401101.

3) माहितीचा विषय : विकास आराखड्यातील फेरबदलाबाबत झालेल्या ठराव, पत्रव्यवहार व दस्तऐवजाबाबत.

**(एक)** आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील : तत्कालीन नगरपरिषदेच्या नगररचना विभागातर्फे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 नुसार मंजूर विकास आराखड्यातील आरक्षणात फेरबदलाबाबत झालेल्या पुढील ठराव, पत्रव्यवहार व दस्तऐवजांच्या सांक्षाकित छायाप्रती मिळाव्यात.

1) तत्कालीन नगरपरिषदेच्या नियोजन व विकास समितीच्या दि. 03/04/1998 रोजीच्या सभेतील ठरावांसंबंधीचे इतिवृत्तांत.
2) तत्कालीन नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभा दि. 25/06/1998 रोजीच्या विषय क्र. 18 ठराव क्र. 132 (3) च्या ठरावाची प्रत.
3) तत्कालीन नगरपरिषदने उपरोक्त विषयांकित प्रस्ताव शासनाकडे अंतिम मंजूरीसाठी पाठवलेल्या पत्रांच्या व त्या सोबत पाठवलेल्या दस्तांच्या पुढील प्रति मिळाव्यात — प्रत क्र. (1) नपा/नर/405/9863/2001-02,दि. 11/02/2002, पत्र क्र. (2) नपा/नर/43/2095/2001-02, दि. 14/06/2001.
4) तत्कालीन नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभा दि. 31/10/2001 रोजीच्या ठराव क्र. 387 (अ) च्या ठरावाची प्रत.
5) मा. महासभा दि. 18/09/2003, तहकूब सभा दि. 06/10/2003, प्रकरण क्र. 43, ठराव क्र. 27 (ब) च्या ठरावाची प्रत.
6) सदर महासभेचा प्रस्ताव शासनाकडे अंतिम मंजुरीसाठी पाठविलेल्या प्रस्तावाच्या प्रति मिळाव्यात.
7) सदर प्रस्तावाबाबत शासनाने दिलेल्या निर्णयाच्या आदेशाच्या प्रति मिळाव्यात.

**(दोन)** माहिती ज्याच्याशी संबंधीत असेल तो कालावधी: एप्रिल 1998 ते डिसेंबर 2001

**(तीन)** माहितीचे प्रयोजन : भारतीय राज्य घटनेने प्रदान केलेले मुलभुत अधिकार.

**(चार)** माहिती टपालद्वारे किंवा व्यक्तीश : माहिती लिखित स्वरुपात व्यक्तीश: आवश्यक आहे.

**(पाच)** माहिती टपालद्वारे असेल त्याबाबतीत : लागू नाही

4) अर्जदार दारिद्ररेषेखालील आहे किंवा : नाही

(असे असल्यास त्याच्या पुराव्यासहीत छायांकित प्रत जोडावी).
सदर माहिती अधिकारातील दस्त व जनहितार्थ माहितीसाठी नियमानुसार जे शासकीय शुल्क प्रमाणित होईल ते मी भरण्यास तयार आहे.

**ठिकाण : भाईंदर (पश्चिम)**
**दिनांक :** 06/01/2021

अर्जदाराची सही

**( अशोक बळवंत पाटील )**

010

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/माहिती अधिकार/ 06 /2021 दिनांक :- 25 / 1 /2021

प्रति,
श्री. अशोक बळवंत पाटील
मुर्धा गाव, उत्तन रोड
भाईंदर (प.) ता. जि.ठाणे.

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.
विकास आराखड्यातील फेरबदलाबाबत झालेल्या ठराव, पत्रव्यवहार व दस्तऐवजाबाबत.

संदर्भ :- 1. जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, नगररचना विभाग यांचेकडील जा.क्र.मनपा/नर/माहिती अधिकार/24/2021-22 दि. 19/01/2021 रोजीचे पत्र. (या कार्यालयास पत्र प्राप्त दि. 22/01/2021)
2. आपणांकडील दि. 07/01/2021 रोजीचा माहिती अधिकार नियमाअंतर्गत अर्ज.

महोदय,

जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, नगररचना विभाग यांनी संदर्भित पत्र क्र. 01 अन्वये आपणांकडील माहिती अधिकार नियमा अंतर्गत प्राप्त अर्जातील मुद्दा क्र. 01 तत्कालिन नगरपरिषदेच्या नियोजन व विकास समितीच्या दि. 03/04/1998 रोजीच्या सभेतील ठरावा संबंधीचे इतिवृत्तांत व मुद्दा क्र. 02 तत्कालिन नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभा दि. 25/06/1998 रोजीच्या विषय क्र. 18 व ठराव क्र. 132 (3) बाबत माहिती नगरसचिव विभागाकडून उपलब्ध करुन घेणेबाबत आपणांस लेखी कळवून, सदर पत्राची प्रत व आपला संदर्भिय क्र. 02 च्या अर्जाची छायांकित प्रत नगरसचिव विभागाकडे अग्रेषित केली आहे.

आपल्या पत्रातील मुद्दा क्र. 01 च्या अनुषंगाने, नगरसचिव विभागातील तत्कालिन नगरपरिषदेच्या अभिलेख्याची पडताळणी केली असता, नियोजन व विकास समितीच्या दि. 03/04/1998 रोजीच्या सभेतील ठरावा संबंधीचे इतिवृत्तांतांची मुळनस्ती नगरसचिव विभागाकडे उपलब्ध नसल्याचे दिसून येत आहे. करिता आपणांस अपेक्षीत माहिती देता येत नाही.

आपल्या पत्रातील मुद्दा क्र. 02 च्या अनुषंगाने, तत्कालिन नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभा दि. 25/06/1998 रोजीच्या विषय क्र. 18 व ठराव क्र. 132 (3) ची साक्षांकित प्रत या पत्रासोबत उपलब्ध करुन देत आहोत.

सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल दाखल करता येईल.

कळावे.

(कैलास दा. म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी तथा लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका
(भ्रमणध्वनी क्र. 9967481732)

pc 2Z:\Pranali\Mahiti Adhikar\Letter - Ashok Patil.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका
नगररचना विभाग
स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पु.)
Email ID :- mbmc.tp@gmail.com

RIGHT TO INFORMATION

जा.क्र. मनपा/नर/माहिती अधिकार/ २८/२०२१-२२ दिनांक:- १९/०१/२०२१

केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, २००५

M.A. (Legal) 202011 M.C.

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगररचना विभाग
जा.क्र. न.पा/मा.अ.
आवक: ०८/२०२१......
दिनांक:- २१/१/२०२१

प्रति,
श्री. अशोक बळवंत पाटील
मुर्धागाव, उत्तन रोड,
भाईंदर (पश्चिम)

विषय - केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत माहिती मिळणेबाबत.

संदर्भ - केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत आपला आवक क्र. मनपा/नर/माअ/24/21-22, दि.07/01/2021 अन्वये प्राप्त अर्ज.

महोदय,

केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत प्राप्त आपल्या संदर्भित अर्जाचे अनुषंगाने या कार्यालयाचे अभिलेखाची पडताळणी करुन आपणास पुढीलप्रमाणे माहिती ही उपलब्ध करुन देणेत येत आहे.

संदर्भिय पत्रान्वये आपण तत्कालीन नगरपरिषदेच्या नगररचना विभागातर्फे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 11966 चे कलम 37 नुसार मंजूर विकास आराखडयातील फेरबदलाबाबत झालेल्या ठराव, पत्रव्यवहार व दस्तऐवजांच्या साक्षांकित छायाप्रती मिळणेकामी केलेल्या मागणी नुसार खालील प्रमाणे माहिती देण्यात येत आहे.

मुद्दा क्र.1 :- तत्कालीन नगरपरिषदेच्या नियोजन व विकास समितीच्या दि.03/04/1998 रोजीच्या सभेतील ठरावा संबंधिचे इतिवृत्तांत या कार्यालयामार्फत तयार केलेले नसून या कार्यालयाचे अभिलेखी उपलब्ध नाहीत. सदर प्रकरणी आपण महानगरपालिकेच्या नगरसचिव विभागाकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी. आपला संदर्भिय अर्ज सदर विभागास वर्ग करण्यात येत आहे.

मुद्दा क.2 :- तत्कालीन नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभा दि.25/06/1998 रोजीच्या विषय क्र.18, ठराव क्र.132(3) या कार्यालयाचे अभिलेखी उपलब्ध नाही. सदर प्रकरणी आपण महानगरपालिकेच्या नगरसचिव विभागाकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी. आपला संदर्भिय अर्ज सदर विभागास वर्ग करण्यात येत आहे.

मुद्दा क.3 :- तत्कालीन नगरपरिषदेने शासनाकडे सादर केलेल्या जावक क्र.नपा/नर/405/9863/2001-02 दि.11/02/2002 व पत्र क्र.नपा/नर/43/2095/2001-02 दि.14/06/2001 या पत्रांच्या छायापतीसाठी प्रति पृष्ठ रु.2/- प्रमाणे एकूण 6 पृष्ठांसाठी रु.12/- व साक्षांकित प्रतीसाठी प्रति पत्र रु.100/- प्रमाणे 2 पत्रांसाठी रु.200/- असे एकूण 212/- शासकीय शुल्काचा भरणा करुन सदरच्या छायाप्रती कार्यालयीन वेळेत उपलब्ध करुन घ्याव्यात.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगररचना विभाग**

स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पु.)

Email ID :- mbmc.tp@gmail.com

RIGHT TO INFORMATION


जा.क्र. मनपा/नर/माहिती अधिकार/ २४/२०२१-२२ दिनांक:- ९८/०१/२०२१

**केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, २००५**

M.A. (Legal) 202011 M.C.

मुद्दा क.4 :- तत्कालीन नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभा दि.31/10/2001 रोजीच्या ठराव क्र.387(अ) ची साक्षांकित छायाप्रत रु.102/- शासकीय शुल्काचा भरणा करुन सदरच्या साक्षांकित छायाप्रती कार्यालयीन वेळेत उपलब्ध करुन घ्याव्यात.

मुद्दा क.5 :- मा. महासभा दि.18/09/2003 तहकुब सभा दि.06/10/2003 प्रकरण क्र.43 ठराव क्र.27(ब) ची साक्षांकित छायाप्रत रु.104/- शासकीय शुल्काचा भरणा करुन सदरच्या साक्षांकित छायाप्रती कार्यालयीन वेळेत उपलब्ध करुन घ्याव्यात.

मुद्दा क.6 :- सदर महासभेचा प्रस्ताव शासनाकडे अंतिम मंजुरीसाठी पाठविलेल्या जा.क्र.नपा/नर/329/5206/98-99 दि.05/10/98, जा.क्र.नपा/नर/43/2095/2001-02 दि.14/06/2001, जा.क्र.नपा/नर/405/9863/2001-02 दि.11/02/2002 अन्वयेच्या पत्राची छायाप्रत रु.16/- व साक्षांकित प्रत रु.300/- असे एकूण रु.316/- शासकीय शुल्काचा भरणा करुन सदरच्या साक्षांकित छायाप्रती कार्यालयीन वेळेत उपलब्ध करुन घ्याव्यात. व प्रस्तावासोबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या छायाप्रतीसाठी शासकीय शुल्क रु. 50/- चा भरणा भरुन सदरच्या छायाप्रती कार्यालयीन वेळेत उपलब्ध करुन घ्याव्यात.

मुद्दा क.7 :- सदर प्रस्तावाबाबत शासनाने दिलेल्या दि.07/06/2006 व दि.06/08/2008 रोजीच्या आदेशाच्या व त्यासोबतच्या नकाशाच्या छायाप्रतीसाठी शासकीय शुल्क रु.22/- चा भरणा भरुन सदरच्या छायाप्रती कार्यालयीन वेळेत उपलब्ध करुन घ्याव्यात.

उपरोक्त माहितीने आपले समाधान न झाल्यास केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत कलम 19(1) अन्वये आपणास प्रथम अपील हे श्री. दिलीप घेवारे, प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्र. सहा. संचालक, नगररचना, नगररचना विभाग यांचेकडे सदरचे पत्र प्राप्त झाल्यापासून 30 दिवसांच्या आत दाखल करता येईल.

(प्रांजल कदम)<br>
जन माहिती अधिकारी तथा<br>
कनिष्ठ अभियंता<br>
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत - पुढील कार्यवाहीस्तव<br>
जन माहिती अधिकारी<br>
नगरसचिव विभाग<br>
मिरा भाईंदर महानगरपालिका<br>
संदर्भिय पत्रातील मुद्दा क्र.1 व 2 बाबतची माहिती अर्जदारास आपल्या स्तरावर विहीत मुदतीत उपलब्ध करुन दयावी.<br>
(सोबत संदर्भिय पत्र)

# मिरा भाईंदर नगर परिषद

## मा. सर्वसाधारण सभा दिनांक २५.०७.१९९८

विषय क्र.१८ :- मा. नियोजन व विकास समिती दि. ०३.०७.९८ चे बैठीत शिफारस केलेल्या ठरावावर निर्णय घेणे.

(५) :- महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार मंजूर विकास योजनेत फेरबदल करणे.

(अ) विकास योजनेतील मुर्धा उत्तन रस्त्यापासून पश्चिमेकडे धावणारा १८.०० मी. रुंदीच्या डी.पी. रस्त्याच्या आखणीत बदल करणे व आरक्षण क्र. ९९ - "कोंडवाडा" पुनर्रचित करणे बाबत ठराव क्र. ३५ (५).

ठराव क्र. :- 932(3)

मिरा भाईंदर नगरपरिषदेची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ अन्वये दि. १५ मे १९९७ रोजी मंजूर करण्यात आलेली आहे.

सदर विकास योजनेत मुर्धा उत्तन रस्त्यापासून स.नं.८ पासून मुर्धा-राई, मोर्वा गावाच्या मागून उत्तन रस्त्यास मिळणारा १८.०० मी. रुंदीचा डी.पी. रस्ता दर्शविण्यात आलेला आहे. सदर रस्त्याच्या आखणीमध्ये उत्तन मुर्धा रस्त्यापासून स.नं.१५ पर्यंत काही बांधकामे आलेली असल्यामुळे सदरचा रस्ता विकसित करण्यास भविष्यात अडचण निर्माण होणार आहे. त्यासाठी स.नं.१५ पासून स.नं.२११ व ४ पासून मुर्धा उत्तन रस्त्यास जोडल्यास विकास योजनेतील १८.०० मी. रुंद रस्ता विकसित करण्यास अडचण निर्माण होणार नाही. तसेच उपरोक्त कोंडवाड्यामध्ये आरक्षण स.नं.२११ मध्ये दर्शविल्यास भविष्यात विकसित करण्यास अडचण होणार नाही.

तरी मंजूर विकास योजनेतील रस्त्याच्या आखणीत बदल दर्शविणे व आरक्षण पुनर्रचित करणेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार शासनास विनंती करण्यास यावी.

सूचक :- श्री. मोहन पाटील

अनुमोदन :- श्री. प्रफुल्ल पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर.

सत्यप्रत

मुख्याधिकारी
मिरा भाईंदर नगरपालिका परिषद,

माहिती अधिकार [illegible] अंतर्गत
देण्यात [illegible] सत्यप्रत

नगर रचना विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका